कार्यालय आदेश क्र. २१४६

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
वाहतूक व्यवस्थापक कार्यालय
दिनांक : १४।८।१७

विषय : विना तिकिट/पास प्रवासी दंडाच्या रकमेत वाढ करणेबाबत.

संदर्भ : मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची दि.१४/८/२०१७ रोजीची मान्यता .

परिवहन महामंडळाकडील टप्पा वाहतूकीच्या परवान्यास अनुसरून संचलन करणाऱ्या बसेस मधील प्रवाशांनी प्रवास करताना बस प्रवासाचे तिकिट/पास न घेणे यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम क्र.१७८ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याच्या तरतूदीस अनुसरून परिवहन महामंडळाच्या टप्पा वाहतूकीच्या बस संचलनातील जे प्रवासी प्रवासाचे तिकिट काढण्यास टाळाटाळ करतील किंवा तिकिट काढणार नाहीत, अशा प्रवाशांना रूपये ३००/- दंड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे परिवहन महामंडळाकडील टप्पा वाहतूकीच्या परवान्यास अनुसरून संचलन करणाऱ्या बसेस मधील प्रवाशांनी कोणत्याही प्रकारच्या सवलतीच्या प्रवासी पास मध्ये खाडाखोड, दुरूपयोग, गैरप्रकाराने टप्पा वाहतूकीचे प्रवासी भाडे अदा न करता प्रवास करणे यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम क्र.१७८ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याच्या तरतूदीस अनुसरून बस संचलनातील जे प्रवासी पासचा गैरवापर करून प्रवास करतील, अशा प्रवाशांना प्रतिदिनी केलेल्या विना प्रवासी भाडे अदा न केल्याच्या कारणास्तव रू.५००/- याप्रमाणे दंड आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. सर्व पर्यवेक्षकीय व तपासणी सेवकांना पूर्वीच्या धोरणानुसार सुधारीत दंडात्मक कारवाईची अंमलबजावणीचे अधिकार या कार्यालय आदेशान्वये प्रदान करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे दंडात्मक कारवाईची अंमलबजावणी दि.-१४/८/१७ पासून रात्री १२.०० वा.नंतर लागू राहील.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रत :
वाहतूक व्यवस्थापक
सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख
हेडक्वॉर्टर १ व २
पास विभाग